# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 173 B.N.S.S)**

**प्रथम खबर अहवाल**

**(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)**

1. **District (जिल्हा):** सांगली **P.S. (पोलीस ठाणे):** जत **Year (वर्ष):** 2026

**FIR No. (प्रथम खबर क्र.):** 0381 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 30/06/2026 00:40 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):**

1 **Day (दिवस):** सोमवार **Date from (दिनांक पासून):** 20/04/2026 **Date To (दिनांक पर्यंत):** 20/04/2026

**Time Period (कालावधी):** प्रहर ६ **Time From (वेळेपासून):** 17:30 तास **Time To (वेळेपर्यंत):** 17:30 तास

(b) **Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):** **Date (दिनांक):** 30/06/2026 **Time (वेळ):** 00:12 तास

(c) **General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):** **Entry No. (नोंद क्र.):** 002 **Date and Time (दिनांक आणि वेळ):** 30/06/2026 00:12 तास

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1. **(a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर):** पूर्व, 14 कि.मी. **Beat No. (बीट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** आरआर ढाब्याजवळ, मुंचुडी गावाजवळ ताजत येथे,



Scanned with OKEN Scanner

7. Details of
अज्ञात

(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):

District (State) (जिल्हा (राज्य)): (महाराष्ट्र)

6. **Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):**

(a) Name (नाव): श्री योगेश रमेश चव्हाण

(b) Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):

(c) Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष): 1988

(d) Nationality (राष्ट्रीयत्व):भारत

(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):

(f) Passport No. (पारपत्र क्र.):

Date of Issue (दिल्याची तारीख ):

Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

(h) Occupation (व्यवसाय):

(i) Address (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पोलीस निरीक्षक,अँटी करप्शन, ब्युरो, सांगली, जत, सांगली, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | पोलीस निरीक्षक,अँटी करप्शन, ब्युरो, सांगली, जत, सांगली, महाराष्ट्र, भारत |

(j) Phone number (फोन नं.):

Mobile (मोबाइल क्र.): 91-8108601919



Scanned with OKEN Scanner

7. Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):

Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या): 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री विक्रम विठठल घोदे पोकॉ1796 जत पोलीस | | | 1. पोकॉ/1796 जत पोलीस,शंकर जाधव यांचे घरी भाडयाने,Town/Village (शहर / गाव): मोरे कॉलनी जत ताजत,Tehsil (तहसील): जिसांगली,Police Station (पोलीस ठाणे): जत,District (जिल्हा): सांगली,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |
| 2 | श्री काशीराम कृष्णा माने | | | 1. Town/Village (शहर / गाव): पोलीस पाटील सिध्दनाथ गाव,Tehsil (तहसील): माने वस्ती ताजत जिसांगली,Police Station (पोलीस ठाणे): जत,District (जिल्हा): सांगली,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

8. Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):

9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| | | | | |

10. Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :

11.



Scanned with OKEN Scanner

Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
| --- | --- |

12. First Information contents (प्रथम खबर हकिगत):

वर्दीजबाब दि. 30.06.2026

मी, योगेश रमेश चव्हाण वय – 38 वर्षे व्यवसाय नोकरी पोलीस निरीक्षक अँटी करप्शन ब्युरो, सांगली रा.सांगली ता.मिरज जि.सांगली मो.नं. – 8108601919 सरकारतर्फे फिर्यादी होवून देतो फिर्यादी जबाब की, मी पोलीस निरीक्षक या पदावर अँटी करप्शन ब्युरो, सांगली येथे कार्यरत आहे.

दि.18.04.2026 रोजी दुपारी 15.00 वा.चे सुमारास मी कार्यालयात हजर असताना पोलीस उपअधीक्षक श्रीमती यास्मीन इनामदार यांनी आम्हास त्यांचे कक्षामधून बोलावून घेवून तक्रारदार श्री.संतोष पांडुरंग शिंदे रा.सिध्दनाथ ता.जत जि.सांगली यांनी फोनव्दारे संपर्क करुन त्यांची जत पोलीस ठाणे येथील श्री घोदे पोलीस कर्मचारी यांचेविरुध्द लाच मागणीची तक्रार कळविली असलेचे सांगून ते सध्या बाहेरगावी असुन ते दि.20/04/2026 रोजी परत येणार असलेचे सांगून त्यांनी त्यांची तक्रार जत येथे येवून घेण्याची विनंती केली असलेचे सांगितले. श्रीमती यास्मीन इनामदार मॅडम यांनी मला तक्रारदार यांची तक्रार ऐकुन पुढील कारवाई करणेच्या सुचना दिली होती. त्यानंतर मी तक्रारदार यांना आम्ही पथकासह दि.20/04/2026 रोजी जत येथे येत असलेचे कळवुन तेथे आल्यावर संपर्क करीत असल्याचे सांगितले.

त्यानंतर मी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी सो, जिल्हा परीषद सांगली यांना पत्र व्यवहार करुन वर्ग-3 चे दोन पुरुष कर्मचारी यांची पंच सेवा इकडील कार्यालयास उपलब्ध करुन देणेची विनंती करून पंच साक्षीदार यांचे मोबाईल क्रमांक प्राप्त करून त्यांना संपर्क करुन दि.20/04/2026 रोजी दुपारी 15.00 वाजता एसीबी कार्यालय सांगली येथे हजर राहणेच्या सुचना दिल्या.

दि.20/04/2026 रोजी मी व स्टाफ असे कार्यालयात हजर असताना मी दिले सुचनेप्रमाणे वरील दोन्ही पंच 15.15 वा.चे सुमारास एसीबी कार्यालय सांगली येथे आमचे समक्ष हजर झाले. त्यानंतर मी वरील दोन्ही पंचांना लोकसेवक यांचेविरुध्द लाचेच्या मागणीबाबत पडताळणी करुन लाचलुचपतीचा सापळा लावावयाचा आहे, त्याकामी पंच साक्षीदार म्हणून काम करण्यास तयार आहात का, असे विचारता, दोन्ही पंचानी पंच म्हणून काम करण्यास संमती दिली.

त्यानंतर मी, दोन्ही पंच, पोना/प्रितम चौगुले, पोकॉ/सुदर्शन पाटील, पोकॉ/सागर नायकुडे असे डिजीटल व्हाईस रेकॉर्डर, व्हिडीओ रेकॉर्डर, मेमरी कार्ड, लॅपटॉप, प्रिंटर, अल्ट्राव्हायलेट दिवा, सिल, अॅन्थ्रासिन पावडर, काळे रंगाचे कापड, साबण व इतर आवश्यक साहित्य घेऊन खाजगी चारकचाकी वाहन मारुती सुझुकी अर्टिगा नं.एमएच-10/डीक्यु- 6485 मधून कार्यालयातून 15.25 वाजता रवाना होवून स्टेशन चौक, पुष्पराज चौक, मिरज मार्गे, जत शहराचे थोडे पाठीमागे बंद पडलेले दुध शीतकरण केंद्राजवळ सुरक्षित ठिकाणी 17.15 वा.चे सुमारास दाखल झालो. त्यानंतर मी तक्रारदार



Scanned with OKEN Scanner

संतोष शिंदे यांना संपर्क करून आमचेकडील वाहनाचे वर्णन सांगून आम्ही थांबलो त्याठिकाणी येणेच्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे दोन अनोळखी इसम हे दोन वेगवेगळे वाहनावरुन आमचे समक्ष हजर झाले. त्यांचेतील दोनचाकी वाहन होंडा शाईन आरटीओ क्रमांक एम.एच 10 डी झेड 1804 या वाहनावरील इसमाने त्यांची ओळख श्री.संतोष पांडुरंग शिंदे अशी सांगुन त्यांचे सोबत हीरो होंडा सी.डी 100 एस.एस दोनचाकी वाहन क्र.एमएच-11 डी. 1917 वरुन आलेले इसम हे त्यांचे भाऊ श्री सुखदेव शिंदे रा.सिध्दनाथ असे असलेचे सांगितले.

त्यानंतर माझे सुचनेप्रमाणे तक्रारदार श्री.संतोष शिंदे व त्यांचे भाऊ श्री सुखदेव शिंदे हे आमचेकडील वाहनात बसले. मी त्यांना माझी, ए.सी.बी-कडील स्टाफ व पंच यांची ओळख करून दिली. त्यानंतर मी सदर कारवाईसाठी श्री. नजीर मेहबुब जमादार यांनी पंच नं. 1 म्हणुन व श्री. रमेश भगवान सोनवणे यांनी पंच नं.2 म्हणुन काम करण्याचे ठरवले.

त्यानंतर तक्रारदार श्री. संतोष शिंदे यांनी त्यांची लाच मागणीची तक्रार पंचांसमक्ष थोडक्यात कथन केली. त्यामध्ये तक्रारदार यांनी, श्री घोदे पोलीस जत पोलीस ठाणे यांनी तक्रारदार यांचे भाऊ विजय व पुतण्या महेश यांचेवर चोरीची केस होईल सदर केस न करणेसाठी व कोणतीही कारवाई न करणेसाठी श्री घोदे पोलीस यांनी वडील पांडुरंग शिंदे यांचेकडे दोन लाख रुपये लाचेची मागणी केली आहे अशा आशयाची हकीकत सांगीतली.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. संतोष शिंदे यांना ब्युरोच्या कार्यप्रणालीबाबत माहिती देवून त्यांना त्यांचा तक्रारी अर्ज देण्याबाबत सुचना दिल्या. त्याप्रमाणे तक्रारदार श्री. संतोष शिंदे यांनी त्यांचेसोबत आणलेला त्यांचा हस्तलिखीत लाच मागणीचा तक्रारी अर्ज आमचे समक्ष हजर केला.सदर तक्रारी अर्जाचे अवलोकन करता त्यामध्ये " मी वरील प्रमाणे असुन वरील मुळ पत्यावर जन्मापासुन राहत आहे. माझे वडील पांडुरंग शिंदे भाऊ विजय शिंदे तसेच चुलत भाऊ सुखदेश शिंदे व त्यांचा मुलगा महेश शिंदे हे शेती करतात.

दि.29 मार्च 2026 रोजी रात्री सुमारे 09.30 वाजणेचे सुमारास माझ्या घरी आमच्या गावचे पोलीस पाटील काशीराम माने जत पोलीस स्टेशन चे घोदे पोलीस हे आले होते. तसेच त्याचे सोबत एक अनोळखी माणुस होता. त्यांनी आमचे घरच्या विषयी विचारपुस केली त्यानंतर ते निघुन गेले. त्यानंतर दुस-या दिवशी सकाळी 10.30 वा.चे सुमारास पुन्हा घोदे पोलीस व त्यांचे दोन साधे वेषातील पोलीस आमचे घरी आले व माझे भाऊ विजय आणि चुलत पुतण्या महेश यांची चौकशी केली व निघुन गेले.

त्यानंतर दोन दिवसांनी घोदे पोलीस आमचे घरी आले त्यांनी माझे वडील पांडुरंग शिंदे यांना बाजुला घेवुन सांगितले कि, तुझा मुलगा विजय व नातु महेश यांचेवर चोरीची केस होईल केस करायची नसेल तर माझेसाठी व साहेबांसाठी काही तरी दयावे लागतील असे म्हणुन दोन लाख रुपये लाचेची मागणी केली. त्यानंतर चार पाच दिवसांनी माझे वडील, आमचे गावचे पोलीस पाटील काशीराम माने व घोदे पोलीस यांच्यात प्रकरण मिटविण्यासाठी व कोणतीही कारवाई न करण्यासाठी चर्चा झाली त्यामध्ये घोदे पोलीस यांनी स्वत:साठी दोन लाख रुपयाची लाचेची मागणी केली. घोदे पोलीस यांना पैसे दिले नाहीतर ते विजय व महेश वर खोटा गुन्हा दाखल करतील याची खात्री वाटल्याने वडीलांनी पैश्याची व्यवस्था करतो असे सांगून ते घरी निघुन आले व मला सर्व सांगितले. सदरचे प्रकरण मिटवण्यासाठी घोदे पोलीस दोन लाख रुपये लाचेची रक्कम मागत असल्याची माझी



Scanned with OKEN Scanner

खात्री झाली. माझेत व घोदे पोलीस यांचेमध्ये कोणताही भांडण, वादविवाद नाही तसेच ऊसनवारी कोणताही आर्थिक व्यवहार नाही. तरी घोदे पोलीस जत पोलीस ठाणे यांचेवर कायदेशिर कारवाई व्हावी हि विनंती आहे." अशी हकीकत अर्जामध्ये नमूद आहे.

त्यानंतर मी सदर तक्रारी अर्जावर सही केली. मी तक्रारदार श्री. संतोष शिंदे यांचा तक्रारी अर्ज दोन्ही पंचाना वाचण्यास दिला. दोन्ही पंचांनी तक्रारी अर्ज वाचून तक्रारदार यांनी तोंडी सांगीतलेली तक्रार व तक्रारी अर्जामधील मजकूर एकच असल्याची खात्री करून तक्रारी अर्जावर दोन्ही पंचांनी सह्या केल्या.

त्यानंतर तक्रारदार यांचे तक्रारीची पडताळणी करुन लोकसेवक श्री घोदे पोलीस जत पोलीस ठाणे यांचेविरूध्द लाचलुचपतीची सापळा कारवाई करण्याचे निश्चित केले. मी तक्रारदार व दोन्ही पंचांना कार्यालयाकडील डिजीटल व्हाईस रेंकॉर्डर दाखवून त्याचे कार्यपध्दतीबाबत माहिती दिली. त्यामध्ये नविन एक मेमरीकार्ड घालून मेमरीकार्ड मध्ये पुर्वीचे संभाषण नसल्याचे खात्री करून दिली.

मी तक्रारदार श्री. संतोष शिंदे व पंच क्र.1 नजीर जमादार यांना पडताळणी कारवाईकामी योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर मी 17.46 वाजता माझे, तक्रारदार व दोन्ही पंचांचे पडताळणी कारवाई वेळचे निवेदन डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये तसेच सोनी हॅन्डीकॅममध्ये रेकॉर्ड केले. मी तक्रारदार व पंच नं.1 यांना दिले सुचनांची उजळणी करून दिली.

त्यानंतर लोकसेवक श्री घोदे पोलीस कर्मचारी जत पोलीस ठाणे यांचा ठावठिकाणा निश्चित करणेसाठी लोकसेवक श्री घोदे पोलीस कर्मचारी जत पोलीस ठाणे यांना त्यांचे मोबाईलवर कॉल करुन पडताळणी करण्याचे निश्चित केले. मी दिले सुचने प्रमाणे तक्रारदार श्री संतोष शिंदे यांनी त्यांचे मोबाईल क्रमांक 9373636507 वरुन लोकसेवक श्री घोदे पोलीस कर्मचारी जत पोलीस ठाणे यांचे मो.क्र.9730777030 वर कॉल करुन फोन स्पिकर मोडवर घेतला. लोकसेवक श्री घोदे पोलीस कर्मचारी जत पोलीस ठाणे यांनी तक्रारदार यांचा कॉल स्विकारला नाही.

त्यानंतर मी दिले सुचने प्रमाणे तक्रारदार श्री संतोष शिंदे यांनी त्यांचे मोबाईल क्रमांक 9373636507 वरुन लोकसेवक श्री काशिराम माने पोलीस पाटील सिध्दनाथ गाव यांचे मो.क्र.9730837973 वर कॉल करुन फोन स्पिकर मोडवर घेतला. लोकसेवक श्री काशिराम माने पोलीस पाटील सिध्दनाथ गाव यांनी तक्रारदार यांचा कॉल स्विकारले नंतर लागलीच मी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 17.51 वाजता सुरु करुन तक्रारदार यांचे समोर धरला. त्यावेळी पोलीस पाटील यांनी तक्रारदार यांना ते कोठे आहेत अशी विचारणा करुन चर्चेकरीता पोलीस घोदे यांनी आर.आर ढाब्याजवळ भेटणेबाबत तसेच ते जत मधुन निघालेत व मी पण निघालोय असे सांगुन फोन कट केला. लागलीच मी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बंद केला.

तक्रारदार श्री संतोष पाटील यांनी लोकसेवक श्री घोदे पोलीस कर्मचारी जत पोलीस ठाणे यांचा फोन येत असलेचे सांगितलेने लागलीच मी तक्रारदार श्री संतोष शिंदे यांना लोकसेवक श्री घोदे यांचा फोन स्वीकारुन स्पीकर मोडवर घेणेच्या सुचना दिल्या.तसेच मी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 17.52 वाजता सुरु करुन तक्रारदार यांचे समोर धरला. त्यावेळी लोकसेवक श्री घोदे पोलीस कर्मचारी जत पोलीस ठाणे यांनी तक्रारदार यांना, सिध्दनाथचे पोलीस पाटील यांचा फोन आलेबाबत चर्चाकरुन तक्रारदार यांना आर.आर.ढाब्यावर भेटणेकरीता पंधरा ते वीस मिनिटात येत असलेचे सांगुन फोन कट केला. लागलीच मी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बंद केला. मी तक्रारदार संतोष शिंदे व पंच नं 1



Scanned with OKEN Scanner

नजीर जमादार यांना श्री घोदे पोलीस कर्मचारी जत पोलीस ठाणे व पोलीस पाटील यांचेकडे मुचुंडी गावाजवळील आर.आर.ढाबा येथे पाठवुन त्यांचेकडे पडताळणी कारवाई करण्याचे निश्चीत केले व मी तक्रारदार श्री.संतोष शिंदे, पंच नं.1) श्री नजीर जमादार यांना पडताळणीचे कामी आवश्यक सूचना दिल्या.

त्यानंतर मी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 18.10 वाजता सुरु करुन तक्रारदार श्री संतोष शिंदे यांचे गळयामध्ये लेसच्या सहाय्याने अडकविला. माझे सुचनेप्रमाणे तक्रारदार श्री संतोष शिंदे व पंच नं. 1 श्री. नजीर जमादार हे तक्रारदार यांचेकडील दोनचाकी वाहन हॉंडा शाईन आरटीओ क्र.एमएच-10 डी झेड 1804 वरुन व तक्रारदार यांचा चुलत भाऊ श्री सुखदेव शिंदे हे त्यांचेकडील हिरो हॉंडा दोनचाकी वाहन क्रमांक एम.एच 11 डी 1917 वरुन मुचंडी गावाजवळील आर.आर.ढाबा येथे श्री घोदे पोलीस कर्मचारी जत पोलीस ठाणे व पोलीस पाटील यांची भेट घेणेकरीता रवाना झाले.

मुचुंडी गावाजवळील आर.आर.ढाबा हे आम्ही थांबलेलो असले ठिकाणापासुन खुप अंतरावर असलेने तसेच पुढील कार्यवाही वेळेत होणेकरीता तक्रारदार श्री संतोष शिंदे व पंच नं.1 श्री नजीर जमादार व तक्रारदार यांचे चुलतभाऊ श्री सुखदेव शिंदे हे सदर ठिकाणावरुन रवाना झालेनंतर काही वेळाने मी व सापळा पथक असे आमचेकडील खाजगी चारचाकी वाहन अर्टिगा एम.एच 10 डी.क्यु 6485 वरुन सदर ठिकाणावरुन रवाना होवुन मुंचुंडी गावचे पाठीमागील असले भारत पेट्रोलिअम पेट्रोल पंपाजवळ सुरक्षित ठिकाणी थांबलो.

त्यानंतर काही वेळाने तक्रारदार संतोष शिंदे व पंच नं.1 श्री.नजीर जमादार, व तक्रारदार यांचा भाऊ श्री सुखदेव शिदे असे आधी दिले सुचनेप्रमाणे आम्ही थांबलो असले ठिकाणी भारत पेट्रोलिअम पेट्रोल पंपाजवळ परत आले. त्यावेळी मी, तक्रारदार यांना त्यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून देण्याबाबत इशारा केला. त्याप्रमाणे तक्रारदार यंानी त्यंाचे गळ्यातील लेसच्या सहाय्याने अडकवलेला डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर काढून माझ्याकडे दिला. तो मी 20.02 वाजता बंद करुन सुरक्षितते करीता माझ्या ताब्यात घेतला. त्यानंतर मी दिले सुचनेप्रमाणे पंच नंबर 1 हे आमचेकडील वाहनामध्ये बसले.

त्यानंतर मी, पंच नं 1 श्री. नजीर जमादार यांना श्री घोदे पोलीस कर्मचारी जत पोलीस ठाणे व पोलीस पाटील यांची भेट झाली का? तक्रारदार व त्यांच्या मध्ये काय संभाषण झाले ? असे विचारता, पंच नं. 1 यांनी हकीगत सांगीतली की, "आपण दिले सुचनेप्रमाणे मी व तक्रारदार असे तक्रारदार यांचेकडील दोनचाकी वाहनावरुन रवाना होवून मुचंडी गावाजवळील असले आर.आर धाब्यावजळ जावुन दाखल झालो. त्यावेळी तक्रारदार संतोष शिंदे यांनी पोलीस पाटील यांना फोन केला असता समोरील इसमाने ते आर.आर ढाब्यावरच असुन आलोच असे सांगितले.

त्यानंतर काही वेळाने एक अनोळखी इसम हे आम्ही थांबलो असले ठिकाणी आले त्यावेळी तक्रारदार संतोष शिंदे यांनी त्यांना "पाटील नमस्कार ओ... या" असे म्हणलेवर सदर अनोळखी इसमाने "कुटय ही...आण्णा कुठाय, काय ते पी.एस.आय त्याला उगाच शिव्या दयायला लागलय... माझ्या कामातन वेळ मिळत नाय... आता रेकॉर्डिंग तु एके तेच त्यो...काय बोलाय ते.."असे म्हणाले. सदर अनोळखी इसमाचे बोलणेवरुन सदरचे इसम हे पोलीस पाटील असलेची माझी खात्री झाली. तक्रारदार संतोष शिंदे व पोलीस पाटील यांचेमध्ये बोलणे सुर असताना काही वेळात सदर ठिकाणी आणखीन



Scanned with OKEN Scanner

एक अनोळखी इसम आले त्यावेळी तक्रारदार संतोष शिंदे यांनी सदर अनोळखी इसमास "घोदे साहे नमस्कार" असे म्हणाले असता समोरील अनोळखी इसमाने "नमस्कार" असे म्हणाले. यावरुन सदर अनोळखी इसम हे घोदे पोलीस असलेची माझी खात्री झाली. त्यानंतर तक्रारदार संतोष शिंदे, त्यांचा भाऊ सुखदेव शिंदे, पोलीस पाटील व घोदे पोलीस यांचेमध्ये बराच वेळ चर्चा झाली. त्यामध्ये सज्जन माने इसमाचे भाच्याचे सोन्याची व चांदीची चैन व मोबाईल नेला असलेबाबतही चर्चा झाली.

तक्रारदार, पोलीस पाटील व घोदे पोलीस यांचेमध्ये चोरीची केस दाखल करणेसंदर्भात बोलणे झालेनंतर तक्रारदार शिंदे यांनी घोदे पोलीस यांना "कस कस काय काय मिठवायच म्हणताय, किती म्हणताय" असे विचारलेवर घोदे पोलीस यांनी पोलीस पाटील यांचेकडे बघुन "बोला कि त्यांना" असे म्हणाले. त्यावर पोलीस पाटील यांनी "सांगितल का आकडा" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी "बोला कि,किती म्हणताय" असे विचारलेवर पोलीस पाटील यांनी "सांगितल म्हणत्यात की हयानी" असे म्हणुन "दोन लाख रुपये दया..त्यांच सगळच त्या माणसाला..हयांनी..पोटे पीएसआय ला सगळ...पीआय ला..."असे म्हणुन तक्रारदार यांचेकडे दोन लाख रुपयेची मागणी केली.

तक्रारदार यांनी घोदे पोलीस यांना "ओ साहेब गरीब हाय या परिस्थितीत एक शब्द बोला की" असे म्हणुन रक्कम कमी करणेची विनंती केली असता घोदे पोलीस यांनी तक्रारदार यांना "एकी साठ करतु का" असे विचारले असता तक्रारदार यांनी त्यास होकार दिला. त्यानंतर पुन्हा घोदे पोलीस यांनी "एक साठ" असे तक्रारदार यांना सांगितले. तक्रारदार संतोष शिंदे यांनी सदर रक्कम टप्याने देणेबाबत सांगितले असता घोदे पोलीस यांनी त्यास नकार देवुन घोदे पोलीस यांनी "सगळ आत्ता दयायच...ह.." "टप्पा नको अस असतय माहिती हाय का...ऐक जरा..त्याला शब्द दिलेला असतुय" "साहेब मिटवलय...आता मी जावुन लगीय सांगणार...साहेब हे.." असे म्हणाले. त्यानंतर घोदे पोलीस यांनी तक्रारदार यांना"दोन दिवसान दया म्हणले पहिला त्याला मोकळ करा म्हणल" असे म्हणालेवर तक्रारदार यांनी बुधवार पर्यंतचा वेळ मागुन घेतला. त्यानंतर पोलीस पाटील यांनी तक्रारदार यांना " उदया संध्याकाळपर्यंत विषय मिटवुन टाका जावा" असे म्हणाले. त्यानंतर घोदे पोलीस यांनी तक्रारदार यांना "पाटील...पाटला पाशी आणुन दया" असे म्हणाले.त्यानंतर थोडे वेळाने घोदे पोलीस यांनी तक्रारदार यांना "घेवुन यायच असतल लगेच...थांबायच न्हाय...थांबा आलो म्हणायच", "घडल्या गोष्टीत त्या त्या कंडका पाडुन मोकळ करायच असतय" असे म्हणाले तसेच सदरची रक्कम ही बुधवार देणेचे ठरलेनंतर मी व तक्रारदार असे आमचेकडील दोनचाकी वाहनावरुन व तक्रारदार यांचा भाऊ सुखदेव शिंदे हे त्यांचेकडील दोनचाकी वाहनावरुन आर.आर.ढाबा येथुन निघुन आपले समक्ष हजर झालो" वगैरे हकीकत पंच नं.1) नजीर जमादार यांनी सांगितली.

त्यानंतर आम्ही डिजीटल व्हाईस रेकॉर्डर-मधील पडताळणीचे वेळी तक्रारदार श्री. संतोष शिंदे व लोकसेवक श्री घोदे पोलीस जत पोलीस ठाणे व काशीराम माने पोलीस पाटील यांचे संभाषणातील ध्वनीमुद्रीत झालेली फाईल क्रमांक आरईसी 005 ही ध्वनीमुद्रीत झाली असल्याची व त्यामध्ये वरील प्रमाणे संभाषण झाल्याचे मी, तक्रारदार व दोन्ही पंचानी मुद्देसुद ऐकून खात्री केली.

पडताळणी कारवाईमध्ये, श्री घोदे पोलीस जत पोलीस ठाणे व श्री काशिराम माने पोलीस पाटील सिध्दनाथ गाव यांनी तक्रारदार यांचे भाऊ विजय व पुतण्या महेश यांचेवर चोरीचा गुन्हा दाखल न करणेसाठी तक्रारदार यांचेकडे दोन लाख रुपयेची मागणी करुन चर्चेअंती एक लाख साठ हजार रुपये बुधवार पर्यंत आणुन देणेबाबत तसेच सदरची लाच रक्कम श्री पोटे पी.एस.आय व इतर

(एन.सी.आ
... वेषणफॉर्म
...स "घोदे सा...
...न सदर
...यांचा

पोलीसांकरीता मागणी करीत असलेचे निष्पन्न झाले होते. त्यामुळे श्री पोटे पीएसआय जत पोलीस ठाणे यांचेकडे त्याबाबत पडताळणी करणेचे निश्चित केले.

त्यानंतर दि.27.04.2026 रोजी जत पोलीस ठाणे येथे श्री पोटे पीएसआय यांची पडताळणी केली असता श्री पोटे पीएसआय हे कोर्सकामी बाहेरगावी गेले असलेचे निष्पन्न झाले होते.

दि.30.04.2026 रोजी मी कार्यालयात हजर असताना तक्रारदार श्री संतोष शिंदे यांनी आम्हास सकाळी 9.45 वा.चे सुमारास संपर्क करुन श्री पोटे पी.एस.आय. जत पोलीस ठाणे यांनी आज 12.00 वा चे सुमारास जत पोलीस ठाणे येथे बोलाविलेलें असलेचे सांगितले. त्यामुळे लागलीच तक्रारदार यांना आम्ही 11.30 वा.चे सुमारास जत येथे येतं असलेचे सांगितले.

दि.30.04.2026 रोजी 11.55 वाजता मी ब्युरोच्या कार्यप्रमाणाली प्रमाणे तक्रारदार श्री संतोष शिंदे व पंच नं. 1 श्री. नजीर जमादार यांना जत पोलीस ठाणे येथे श्री पोटे पी.एस.आय जत पोलीस ठाणे यांची भेट घेणेकरीता रवाना करुन पडताळणी केली असता त्यामध्ये लोकसेवक श्री पोटे पी.एस.आय जत पोलीस ठाणे यांचेकडे तक्रारदार यांचे भाऊ विजय व पुतण्या महेश शिंदे यांचे चोरीचे संदर्भातील केस नसलेचे तसेच त्यांनी सदर कारणाकरीता त्यांचेकरीता लोकसेवक घोदे यांचेमार्फतीने तक्रारदार यांचेकडे लाच मागणी केलेली नसलेचे निष्पन्न झाले. त्यामुळे तक्रारदार यांचा भाऊ व पुतण्या यांच्याविरुध्द कोणताही तक्रारी अर्ज चौकशीकरीता पोलीस ठाण्यास प्राप्त झाला नसुन त्याची चौकशी कोणत्याही अधिकारी अगर कर्मचारी यांचेकडे नसलेचे निष्पन्न होवुन घोदे पोलीस व पोलीस पाटील यांनी स्वतःच्या आर्थिक फायदयासाठी लाचेची रक्कम मागणी करत असल्याचे निष्पन्न झाले.

दि.04.05.2026 रोजी तक्रारदार यांनी त्यांची पैशांची जुळणी झाल्याचे कळविलेने मी तक्रारदार श्री संतोष शिंदे यांना दुपारी 16.30 वा.चे सुमारास आम्ही जत येथे येत असलेचे सांगितले. त्यानंतर दोन्ही पंच साक्षीदार यांना संपर्क करुन 15:00 वाजता अँटी करप्शन ब्युरो कार्यालय सांगली येथे हजर राहणेच्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे दोन्ही पंच 14.55 वाजता कार्यालयात हजर झाले. त्यानंतर मी,श्रीमती यास्मीन इनामदार पोलीस उप-अधीक्षक ला.प्र.वि.सांगली, दोन्ही पंच, पोना/प्रितम चौगुले, पोकॉ/सागर नायकुडे , चालक पोशि/ विठ्ठल रजपुत असे डिजीटल व्हाईस रेकॉर्डर, व्हिडीओ रेकॉर्डर, मेमरी कार्ड, लॅपटॉप, प्रिंटर, अल्ट्राव्हायलेट दिवा, सिल, अॅन्थ्रासिन पावडर, काळे रंगाचे कापड, साबण व इतर आवश्यक साहित्य घेऊन शासकीय वाहन महिंद्रा बोलेरो नं.एमएच-10/डीक्यु-9530 मधून व श्री किशोरकुमार खाडे पोलीस निरीक्षक, सपोफौ उमेश जाधव, पोहेकॉ/ऋषीकेश बडणीकर, पोहेका/रामहरी वाघमोडे, पोना/धनंयज खाडे,पोशि/सुदर्शन पाटील,पोशि/अजित पाटील असे खाजगी चारचाकी वाहन मारुती सुझुकी अर्टिगा नं.एम.एच.10 डी.क्यु 6485 मधुन कार्यालयातून 15.00 वाजता रवाना होवून स्टेशन चौक, पुष्पराज चौक, मिरज मार्गे, जत शहराचे थोडे पाठीमागे बंद पडलेले दुध शीतकरण केंद्राजवळ सुरक्षित ठिकाणी 16.35 वा.चे सुमारास दाखल झालो. त्यानंतर मी तक्रारदार संतोष शिंदे यांना संपर्क करून आम्ही थांबलो त्याठिकाणी येणेच्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे तक्रारदार संतोष शिदे हे दोनचाकी वाहन होंडा शाईन आरटीओ क्रमांक एम.एच 10 डी.झेड 1804 या वाहनावरुन व त्यांचा चुलतभाऊ श्री सुखदेव शिंदे हे दोनचाकी वाहन क्र.एमएच-11 डी 1917 वरुन आमचे समक्ष हजर झाले.

तक्रारदार संतोष शिदे यांना दि.20.04.2026 रोजीचे पडताळणी कारवाई दरम्यान श्री घोदे पोलीस जत पोलीस ठाणे यांनी व काशीराम माने पोलीस पाटील सिध्दनाथ यांनी मागणी केलेली लाच



Scanned with OKEN Scanner

रक्कम ही त्यांचेकरीता मागणी केलेली असलेने तसेच सदरची लाच रक्कम ही श्री घोदे पोलीस जत पोलीस ठाणे यांनी श्री काशीराम माने पोलीस पाटील सिध्दनाथ यांचेकडे देणेस सांगितलेले असलेने काशीराम माने पोलीस पाटील सिध्दनाथ ग्राव यांचेवर सापळा कारवाई करावायचे करण्याचे निश्चित केले.

त्यानंतर मी दोन्ही पंचा समक्ष प्रथम माझे, त्यानंतर तक्रारदार व त्यानंतर दोन्ही पंचाचे निवेदन 17.11 वा ते 17.13 यावेळेत डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड केले.

श्री काशीराम माने पोलीस पाटील सिध्दनाथ गाव यांना त्यांचे मोबाईलवर कॉल करुन पडताळणी करण्याचे निश्चित केले. त्यानंतर माझे सुचने प्रमाणे तक्रारदार श्री संतोष शिंदे यांनी त्यांचे मोबाईल क्रमांक 9373636507 वरुन पोलीस पाटील श्री काशिराम माने यांचे मो.क्र.9730837973 वर कॉल करुन फोन स्पिकर मोडवर घेतला. लोकसेवक काशीराम माने यांनी तक्रारदार यांचा कॉल स्विकारलें नंतर लागलीच मी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 17.16 वाजता सुरु करुन तक्रारदार यांचे समोर धरला. त्यावेळी तक्रारदार संतोष शिंदे यांनी काशीराम माने पोलीस पाटील यांना नमस्कार म्हणुन "कुठ हाय काय असे विचारले असता पोलीस पाटील यांनी "हॉय मुचंडीत हाय जतला गेलतो घरी चाललोय" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार शिंदे यांनी "बर बर मग पैशाची जुळणी झाल्या, कस काय करायच मग" असे विचारले वर पोलीस पाटील माने यांनी "बघु तुला, बघु भेटायला ये" असे म्हणाले त्यावर संतोष शिंदे यांनी "भेटायला येवु...कुठ" असे विचारले असता पोलीस पाटील यांनी "घरी" असे म्हणुन फोन कट केला लागलीच मी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बंद केला.

पडताळणी कारवाईमध्ये लोकसेवक श्री काशीराम माने-पोलीस पाटील सिध्दनाथ गाव यांनी तक्रारदार शिंदे यांना भेटणेची वेळ निश्चित सांगितलेली नसलेने तक्रारदार संतोष शिंदे यांनी काशीराम माने पोलीस पाटील सिध्दनाथ गाव यांना पुन्हा फोन करुन फोन स्पिकर मोडवर घेतला. लोकसेवक काशीराम माने यांनी तक्रारदार यांचा कॉल स्विकारला नाही.

आम्ही बराच वेळ वाट पाहुनही काशीराम माने पोलीस पाटील यांचा तक्रारदार यांना कॉल आला नसलेने तसेच पोलीस पाटील काशीराम माने यांनी तक्रारदार संतोष शिंदे यांना त्यांचे घरी लाच रक्कम घेवुन येणेस सांगितलेचे निष्पन्न झालेने लोकसेवक काशीराम माने पोलीस पाटील यांचेवर लागलीच त्यांचे सिध्दनाथ गाव येथील घरी सापळा कारवाई आयोजित करण्याचे निश्चित केले.

मी तक्रारदार यांचेकडे लाच म्हणुन द्यावी लागणारी रक्कम उपलब्ध आहे का असे विचारले असता त्यांनी सध्या त्यांचेकडे 75,000/- रु लाच रक्कम उपलब्ध असलेचे सांगून 500/- रूपये दराचे 150 नोटा असे एकुण 75,000/- रूपये आमचे व दोन्ही पंचासमक्ष हजर केले. मी तक्रारदार यांना त्यांचेजवळील 75,000/- रूपये रक्कम कशी उपलब्ध केली याबाबत विचारले असता तक्रारदार श्री. संतोष शिंदे यांनी सदर 75,000/- रूपये हे त्यांचेकडील शिल्लक रक्कमेतील असल्याचे सांगीतले. त्यावेळी उर्वरित 85,000/- रूपये कार्यालयाकडील डमी नोटा वापरण्याचे निश्चित केले व डमी नोटांचे 500/- रूपये दराचे दोन बंडल त्यामध्ये प्रत्येकी 100 व 70 नोटा असलेले एकुण दोन बंडल असे 85,000/- रूपये आम्ही पंचासमक्ष हजर केले. त्यानंतर मी सापळा पथकातील अंमलदार यांचेकरवी तक्रारदार यांनी हजर केलेली 75,000/- रूपये रक्कमेच्या नोटांचे नंबर एका को-या कागदावर लिहून घेतले. त्यावर मी, दोन्ही पंच व तक्रारदार यांनी सहया केल्या.

त्यानंतर माझेसुचनेवरुन दोन्ही पंचोनी तक्रारदार यांची अंगझडती घेतली. त्यानंत मी सोबत



Scanned with OKEN Scanner

आणलेले कार्यालयाकडील अल्ट्राव्हायलोट दिवा व अँथ्रासीन पावडर असलेली डबी दोन्ही पंचांना व तक्रारदार यांना दाखविली व त्याचे उपयोग व गुणधर्म त्यांना सांगितले.शासकीय वाहन महिंद्रा बोलेरो क्रमांक एम एच 10 डी क्यु 9530 या वाहनामध्ये जरुर तो अंधार करुन अल्ट्राव्हायलेट दिव्याचे प्रकाशात तक्रारदार यांचे अंगझडतीत मिळुन आलेल्या वरील चीजवस्तु व अंगावरील कपडे व नोटा तपासुन पाहता त्यावर कसलीही चकाकी दिसुन आली नाही.

त्यानंतर माझे सुचनेप्रमाणे पोना/धनंजय खाडे यांनी वरील नोटा एका रददी कागदावर ठेवुन नोटांच्या दोन्ही बाजुस त्यांच्या उजव्या हाताचे बोटाने डबीतील अँथ्रासीन पावडर एकसारखी लावली त्यानंतर पोना/धनंजय खाडे यांनी सदर 75,000/- रु भारतीय चलनी नोटांचा एक बंडल व 85,000/- रु डमी नोटांचे दोन बंडल असे एकुण 03 बंडल तक्रारदार यांचे पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिशामध्ये ठेवले.मी दिले सुचनेप्रमाणे पोना/धनंजय खाडे यांनी त्यांचे दोन्ही हात साबण लावून पाण्याने धुतले. त्यानंतरमाझे, दोन्ही पंचाचे, सापळा पथकातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे हात व अंगावरील नेसते कपडे अल्ट्राव्हायलेट दिव्याचे प्रकाशात तपासून पाहता कोणाचेही हातावर अगर कपडऱ्यावर कसलीही चकाकी दिसली नाही.

त्यानंतर मी सापळा कारवाई पुर्वी माझे, तक्रारदार व दोन्ही पंच यांचे निवेदन डिजीटल व्हाईस रेकॉर्डर व व्हिडीओ रेकॉर्डर मध्ये 18:35 वा. रेकॉर्ड केले आहे. सापळ्याचे वेळी तक्रारदार श्री. संतोष शिंदे व लोकसेवक श्री. काशीराम माने पोलीस पाटील यांचेत होणारे संभाषण पुराव्याचे कामी ध्वनीमुद्रीत करण्याचे निश्चित केले.तसेच सापळा कारवाई यशस्वी झाल्यानंतर आरोपी लोकसेवक यांचेकडुन लाच रक्कम जप्ती ची कारवाईचे व्हिडीओ रेकॉर्डीग करणेचे निश्चीत केले तसेच पोलीस पाटील यांनी लाच रक्कम स्वीकारलेनंतर तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईलवरुन आमचे मोबाईलवर Hiii वॉटसअप हाय असा मेसेज करणेबाबत सांगितले.

लोकसेवक काशीराम माने यांनी लाच रक्कम स्वीकारणेकरीता त्यांचे राहते घरी सिध्दनाथ गाव येथे बोलाविलेले असलेने सदरचे सदर गाव हे जत शहरापासुन सुमारे 30 किमी अंतरावर असलेने पुढील सापळा कारवाई करीता मी, श्रीमती यास्मीन इनामदार मॅडम, पंच नं.2) सोनवणे, अंमलदार पोना/प्रितम चौगुले, पोशि/अजित पाटील, सॉगर नायकुडे असे शासकीय वाहन महिंद्रा बोलेरो मधुन व तक्रारदार व पंच नं.1) नजीर जमादार हे तक्रारदार यांचे दोनचाकी वाहन होंड शाईन यावरुन तसेच तक्रारदार यांचे भाऊ सुखदेव माने व अंमलदार पोहेकॉ/ रामहरी वाघमोडे हे सुखदेव माने यांचेकडील दोनचाकी वाहन हिरो होंडा एम.एच 11 डी 1917 वरुन बंद पडलेले दुध शीतकरण केंद्र येथुन जत विजापुर रोडने पाच्यापुर फाटयावरुन सिध्दनाथ गावचे अलीकडे असलेले जकादेवी मंदिराजवळ सुरक्षित ठिकाणी येवुन थांबलो. तसेच मी पोलीस निरीक्षक किशोरकुमार खाडे यांना जत पोलीस ठाणे जवळ सुरक्षित अंतरावर थांबणेच्या तसेच पोलीस पाटील काशीराम माने यांचेवर सापळा कारवाई झालेनंतर श्री घोदे जत पोलीस ठाणे यांना ताबेत घेणेच्या सुचना दिल्या.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. संतोष शिंदे व पंच नं.1) श्री नजीर जमादार सापळयाचे कामी आवश्यक खालील प्रमाणे सूचना दिल्या. तसेच पोना/धनंजय खाडे यांना सुटकेससह जागेवरच थांबण्याबाबतच्या सुचना देवून त्यांना सापळा कारवाईमधून वगळण्यात आले.

त्यानंतर डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 20.44 वाजता सुरू करून लेसचे सहाय्याने तक्रारदार यांचे गळयात अडकवला. त्यानंतर माझे सुचनेप्रमाणे तक्रारदार व पंच नं. 1 श्री नजीर जमादार हे



Scanned with OKEN Scanner

तक्रारदार यांचेकडील दोनचाकी वाहन हॉडा शाईन क्रमांक एम.एच 10 डी.झेड 1804 वरून श्री. काशीराम माने पोलीस पाटील यांची भेट घेण्याकरीता रवाना झाले. त्यांचे पाठोपाठ मी, पंच व सापळा पथक असे आवश्यक साहित्य घेऊन शासकीय वाहन महिद्रां बोलेरो एम.एच 10 डी.क्यु 9530 मधुन व पोहेकॉ/रामहरी वाघमोडे व पोशि/सागर नायकुडे असे दोनचाकी वाहन हिरो हॉडा एम.एच. 11 डी 1917 वरुन रवाना झाले.

तक्रारदार यांनी त्यांचे दोनचाकी वाहन जकादेवी मंदीराजवळुन सिध्दनाथ गावातील कच्चे रोडने एका वस्तीजवळ जाऊन त्यांचे वाहन थांबवुन सदर वस्तीवरील एका घराजवळ गेलेले दिसले. लागलीच मी व सापळा पथक असे आमचेकडील वाहन व मोटारसायकल सदर घरापासुन सुरक्षित अंतरावर थांबवुन आम्ही वाहनातुन उतरून तक्रारदार व पंच नं. 1 यांचे पाठोपाठ जावून आजु-बाजुस सापळा लावून थांबून राहिलो. त्यानंतर तक्रारदार शिंदे यांनी त्यांचे मोबाईलवरुन कोणालातरी फोन केलेला दिसले. काही वेळाने एक अनोळखी इसम दोनचाकी वाहनावरुन येवुन तक्रारदार संतोष शिंदे यांचेजवळ गेला. तक्रारदार शिंदे व अनोळखी इसम हे बोलत असताना दिसले. तक्रारदार संतोष शिंदे व सदर अनोळखी इसम यांचेमध्ये चर्चा सुरु असताना आम्ही आमचेकडील मोबाईलमध्ये वेळोवेळी तक्रारदार यांचेकडील लाच रक्कम स्वीकारलेबाबतचे पुर्वनियोजित इशारा पाहत होतो. काही वेळाने तक्रारदार हे लोकसेवक यांनी लाच रक्कम स्वीकारलेबाबतचा पुर्वनियोजित इशारा न करता त्यांचेजवळील दोनचाकी वाहन हॉडा शाईन वरुन ते पंच नं.2) नजीर जमादार हे परत येताना दिसले. आम्ही आमचेकडील चारचाकी व दोनचाकी वाहनाने परत सदर वस्तीचे रोडवरुन जकादेवी मंदिराजवळ आलो. आमचे पाठोपाठ तक्रारदार संतोष शिंदे व पंच नं.1) नजीर जमादार हे त्यांचेकडील दोनचाकी वाहनाने परत सदर ठिकाणी आले.

तक्रारदार यांनी त्याचे गळ्यातील लेसच्या सहाय्याने अडकवलेला डिजीटल व्हॉईस रैकॉर्डर काढून माझ्याकडे दिला. तो मी 21.48 वाजता बंद करुन सुरक्षितते करीता माझ्या ताब्यात घेतला. त्यानंतर मी, पंच नं 1 श्री. नजीर जमादार यांना श्री काशीराम माने यांची भेट झाली का? तक्रारदार व त्यांच्या मध्ये काय संभाषण झाले ? असे विचारता, पंच नं 1 यांनी हकीगत सांगीतली की, "आपण दिले सुचनेप्रमाणे मी व तक्रारदार संतोष शिंदे असे तक्रारदार यांचेकडील दोनचाकी वाहनावरुन व रवाना होवून सिध्दनाथ गावातील माने वस्ती येथे गेलो. आम्ही आमचेकडील वाहन थांबवुन वाहनावरुन उतरुन सदर वस्तीवरील असले एका घराजवळ गेलो. तक्रारदार शिंदे यांनी सदर घरामध्ये "आते" म्हणुन घरातील एक महिलेस हाक मारली. अनोळखी महिलेने आतुन आवाज दिलेनंतर तक्रारदार संतोष शिंदे यांनी अनोळखी महिलेस पोलीस पाटील यांचेबददल विचारणा केली असता सदर महिलेने पोलीस पाटील गावामध्ये गेलेले असलेचे सांगितले. त्यावेळी सदरचे घर हे काशीराम माने पोलीस पाटील यांचे असलेची माझी खात्री झाली.

त्यानंतर तक्रारदार संतोष शिंदे यांनी काशीराम माने पोलीस पाटील यांना फोन करुन आम्ही त्यांचे घरी आले असलेबाबत सांगितलेवर काशीराम माने पोलीस पाटील यांनी तकारदार शिंदे यांना ते घरी येत असलेबावत सांगितले. थोडया वेळाने काशीराम माने पोलीस पाटील हे दोनचाकी वाहनावरुन आम्ही थांबलो असलेले ठिकाणी आले. त्यानंतर तक्रारदार शिंदे यांनी काशीराम माने पोलीस पाटील यांना घोदे पोलीस यांना फोन करणेस सांगितले असता पोलीस पाटील यांनी त्यांचे घोदे पोलीस यांचेशी फोनवरुन बोलणे झालेले असुन दोन दिवस थांबणेबाबत सांगितले असलेचे सांगितले.



Scanned with OKEN Scanner

त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांचे उजवे हाताने त्यांचे पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिशामध्ये ठेवलेले पैशाचे तीन बंडल बाहेर काढुन पोलीस पाटील यांचेसमोर धरुन पोलीस पाटील यांना पैसे मोजुन घेणेबाबत सांगितले असता पोलीस पाटील यांनी "तुझ्याकडे राहु दे... नको आता आस कर...तुला एका रात्रीन काय होत न्हाय...आता रात्री बि हाय...तुला मी बरोबर उदया ही करुन टाकतो.. एक रात्र जाऊदे सांगतो ..." "अडचणीचा विषय न्हाय...त्याला घेवुन त्याला विचारुन त्याच्या संपर्काप्रमाणे केल पाहिजे" असे बोलुन पोलीस पाटील यांनी सदरची रक्कम घेणेस नकार दिलेनंतर तक्रारदार यांनी सदर पैशांचे बंडल पुन्हा त्यांचे पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिशामध्ये ठेवले. त्यानंतर तक्रारदार शिंदे यांनी पोलीस पाटील यांना "अँर्ज गेलाय...एनसी केली नाय ना" असे विचारले असता पोलीस पाटील यांनी "अर्ज...अर्ज हाय" असे म्हणाले. त्यानंतर तक्रारदार शिंदे व पोलीस पाटील माने यांचेमध्ये अवांतर चर्चा झाली व काही वेळाने पोलीस पाटील यांनी तक्रारदार शिंदे यांना "बर चला...मी जरा कपडे काढतो...तुम्ही चला" असे म्हणाले व पोलीस पाटील यांनी तक्रारदार शिंदे यांचेकडुन पैसे स्वीकारले नाहीत. त्यानंतर मी व तक्रारदार असे आपण दिले सुचनेप्रमाणे पोलीस पाटील काशीराम माने यांनी पैसे स्वीकारलेले नसलेने आमचेकडील दोनचाकी वाहनावरुन पोलीस पाटील यांचे घराजवळुन निघुन आपले समक्ष हजर झालो" वगैरे हकीकत पंच नं.1) नजीर जमादार यांनी सांगितली.

सदर सापळा कारवाईमध्ये लोकसेवक काशीराम माने पोलीस पाटील सिध्दनाथ गाव यांनी तक्रारदार यांचेकडुन लाच रक्कम न स्वीकारता सदरची रक्कम ही तक्रारदार यांचेकडे एक रात्र ठेवणेबाबत तसेच चौकशी करुन सांगतो असे म्हणुन लाच रक्कम स्वीकारली नसलेचे निष्पन्न झाले.

त्यानंतर दि.05.05.2026 रोजी श्री संतोष शिंदे हे अँटी करप्शन कार्यालय सांगली येथे हजर होवुन त्यांनी हकीकत सांगितली कि, आज रोजी सकाळी मी माझे घरी असताना श्री काशीराम माने पोलीस पाटील हे आमचे घरी आले व त्यांनी मला "तुझे केसचे काम माझेकडे नाही तु घोदे साहेब यांनाच भेट व माझेकडे काही पैसे देऊ नको" असे म्हणुन निघुन गेले. यावरुन काशीराम माने पोलीस पाटील यांना माझी शंका आली असल्याने यानंतर ते माझ्याकडुन पैसे घेणार नसल्याची माझी खात्री झालेली आहे तसेच लोकसेवक श्री घोदे जत पोलीस ठाणे हे देखील माझेकडुन आता लाच रक्कम स्वीकारणार नाहीत याबाबत माझी खात्री झालेली आहे त्यामुळे आपण लोकसेवक श्री घोदे जत पोलीस ठाणे व श्री काशीराम कृष्णा माने पोलीस पाटील सिध्दनाथ गाव यांचेवरील सापळा कारवाई स्थगित करावी व घोदे पोलीस जत पोलीस ठाणे व काशीराम कृष्णा माने पोलीस पाटील सिध्दनाथ गाव यांचेवर लाच मागणीचे अनुशंगाने कायदेशिर कारवाई करावी असा जबाब दिला.

तरी दि. 20.04.2026 रोजी केलेल्या पडताळणी कारवाईमध्ये लोकसेवक श्री विक्रम विठठल घोदे पोकॉ/1796 जत पोलीस ठाणे यांनी आपले पदाचा दुरुपयोग करुन स्वतःचे आर्थिक फायदयाकरीता तक्रारदार संतोष शिंदे यांचे भाऊ विजय व पुतण्या महेश यांचेवर चोरीचा गुन्हा दाखल न करणेसाठी तक्रारदार यांचेकडे दोन लाख रुपयेची मागणी करुन तडजोडीअंती विक्रम घोदे पोकॉ/1796 यांनी एक लाख साठ हजार रुपये पोलीस पाटील काशीराम माने यांचेकडे देणेस सांगितलेले आहे. तक्रारदार यांना काशीराम कृष्णा माने पोलीस पाटील सिध्दनाथ गाव यांनीही चोरीचा गुन्हा दाखल न होणेकरीता विक्रम घोदे पोकॉ/ जत पोलीस ठाणे यांना लाचेची रक्कम देण्यांस प्रोत्साहन दिले व विक्रम घोदे पोकॉ/1796 यांचे सांगण्यावरुन लाच रक्कम स्वीकारणेचा प्रयत्न केला आहे म्हणुन माझी



Scanned with OKEN Scanner

श्री विक्रम विठ्ठल घोदे वय – 40 वर्षे व्यवसाय नोकरी पोकॉ/1796 नेमणुक जत पोलीस ठाणे रा.शंकर जाधव यांचे घरी भाडयाने, मोरे कॉलनी जत ता.जत जि.सांगली व श्री काशीराम कृष्णा माने वय – 36 वर्षे पोलीस पाटील सिध्दनाथ गाव रा.माने वस्ती ता.जत जि.सांगली यांचेविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 चे कलम 7, 12 प्रमाणे कायदेशीर फिर्याद आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब हा संगणकावर टंकलिखीत करण्यात आलेला असून तो प्रिंट काढल्यानंतर मी वाचून पाहिला तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष हा दिला

वर्दीजबाब,

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

**(1)** **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** BIRAPPA NAGANNA LATURE **(पोलीस निरीक्षक) or (किंवा):**

**(2)** **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव): Rank (हुद्दा):**

**No. (क्र.):** **to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3)** **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला): or (किंवा)**

**(4)** **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):** **on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

**R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)**

**Registered by (नोंदणी अधिकारी)**



Scanned with OKEN Scanner

Digitally Signed by: ACHUTRAO VINAYAK MANE
Rank: HC (Head Constable)
Unique No: 72249396004330008
On: 6/30/2026 12:49:46 AM
At PS: JATH, SANGLI



**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** BIRAPPA NAGANNA LATURE

**Rank (हुद्दा):** I (Inspector)

**No. (क्र.):** 12501000450bwlm8701w



14. **Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)**

15. **Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**



Scanned with OKEN Scanner